# आर्थिक विकास
# B.A. 6th Sem ( Economics)

**<u>अर्थ व व्याख्या :–</u>**

आर्थिक विकासाचा प्रश्न हा संपूर्ण जगासमोरील प्रमुख प्रश्न आहे. श्रीमंत व गरीब, विकसीत व विकसनशील अशा सर्वच प्रकारच्या देशांना आर्थिक विकासाच्या प्रश्नांना तोंड दयावे लागते.

" विकासाचा वेग कायम ठेवणे हा श्रीमंत देशांसमोरील प्रश्न असतो, तर विकासाचा वेग वाढविणे हा गरीब देशासमोरील प्रश्न असतो ".

आर्थिक वाढ आणि आर्थिक विकास या दोन्ही संकल्पना एकच समजून त्यात भेद केला जात असे. विसाव्या शतकाच्या मध्यांपर्यंत आर्थिक वाढीलाच 'आर्थिक विकास' म्हंटले जात होते. परंतु आता दोन्ही संकल्पनामध्ये फरक केला जातो.

**<u>आर्थिक विकासाच्या व्याख्या</u>**

1. **किन्डलबर्गर आणि हॅरीक यांच्या मतानुसार :–**

   " लोकांच्या भौतिक कल्याणात सुधारणा म्हणजे आर्थिक विकास होय".

2. **महबुध–उल–हक यांच्या मते :–**

   " आर्थिक विकासाने गरीबीवर प्रहार केला पाहिजे. गरीबी भूकबळी, रोगराई, निरक्षरता, बेकारी आणि असमानता यासारख्या समस्यांचे निवारण करणे हे विकासाचे प्रमुख लक्ष्य असले पाहिजे.

आतापर्यंत फक्त राष्ट्रोय उत्पन्नाच्या वाढीवर लक्ष केंद्रीत केले जात होते. आता गरीबीवर लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. अशा केले तर ढोबळ देशी उत्पादनात आपोआप वाढ होत जाईल.

- आर्थिक विकासाला प्रभावित करणारे घटक

घटक

- आर्थिक घटक
  - मानव संसाधन (श्रम)
  - भांडवल निर्मिती
  - तंत्रज्ञानाची प्रगती
  - नैसर्गिक संसाधने
  - संघटक
  - श्रमविभागान आणि उत्पादनमान
  - बाजारपेठेचा आकार
  - वित्तीय स्थिरता
  - विकासात्मक नियोजन
  - आंतरराष्ट्रोय निर्धारक
- आर्थिकेत्तर घटक
  - सांस्कृतीक प्रवृत्ती
  - सामाजिक मुल्ये आणि सामाजिक संस्था
    - अ) एकत्र कुटूंब पद्धती
    - ब) जाती प्रथा
    - क) सामाजिक प्रवृत्तीमध्ये बदल
    - ड) संख्यात्मक बदल
  - राजकीय आणि प्रशासकीय बदल

अ) **आर्थिक घटक :—**

आर्थिक घटकास मानव संसाधन भांडवल संचय, तंत्रज्ञान, श्रमविभाजन नैसर्गिक साधनसंपत्ती संघटकाचे कार्य इत्यादी घटकाचा समावेश होतो.

1. **मानव संसाधन ( श्रम) :—**

   श्रम हा उत्पादनाचा सजीव, सक्रीय व क्रियाशील घटक असून आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा महत्वपूर्ण घटक आहे. मानव संसाधनाची कुशलता आर्थिक विकासाला प्रभावित करते अर्धविकसीत देशात दरडोई उत्पन्न कमी असते. तसेच भांडवल निर्मिती दर कमी असते अशा वेळेस लोकसंख्येचे भरणपोषण करणे कठीन असते.

2. **भांडवल निर्मिती :—**

   आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे भांडवल निर्मिती होय. भांडवल निर्मिती म्हणजे भांडवली वस्तूच्या साठयात वाढ होय. यंत्रे, संयंत्रे उपकरणे, वाहतूकीची साधने, इत्यादीमध्ये उत्पन्नांचा एक भाग लावला जातो. तेव्हा भांडवल निर्मिती होते.

3. **तंत्रज्ञानाची प्रगती :—**

   देशातील तंत्रज्ञानाचा दर्जा उंचावला असता श्रम, भांडवल आणि इतर उत्पादनाच्या घटकाची उत्पादकता वाढते. देशाची तंत्रज्ञानाविषयक प्रगती झाल्यास नविन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कच्चा मालाचे स्त्रोत शोधून काढले जातात. त्यामुळे कच्चा मालाची उपलब्धता वाढुन देशाच्या उत्पादनात वाढ हाऊ शकते.

4. **नैसर्गिक संसाधने :—**

   नैसर्गिक साधनसंपत्तीचा देशाच्या आर्थिक विकासावर प्रभाव पडतो. त्या सर्व साधनांच्या उपलब्धतेवर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो.नैसर्गिक साधनसंपत्ती मध्ये जमीनीची सुपिकता, भूमीची स्थिती, क्षेत्रफळ, वनसंपत्ती जलसंपत्ती, खनिज संपत्ती याचा समावेश होतो.

5. **संघटक :—**

   संघटक हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा केंद्रबिंदू होय. कारण तो नविन संशोधन करून त्याचा उत्पादनात उपयोग करतो. वस्तूसाठी नविन बाजारपेठ शोधण्यास प्रयत्नशील असणारे घटक उत्पादन कार्यात नवनवीन तंत्रज्ञान वापरून उत्पादनात वाढ घडवून आर्थिक विकासाची गाडी पुढे नेतो.

6. **श्रमविभाजन आणि उत्पादनमानः—**

   प्रामुख्याने श्रमकाचे तीन भागात विभागणी केली जाते कुशल, अकुशल, अर्धकुशल श्रमीकाची विभागणी करून श्रमीकांची कुशलता वाढून त्यांची उत्पादकाता वाढते. जर उत्पादनमान मोठे करेल तर विरोषी करणामूळे विभागन शक्य होते. आर्थिक वृद्धीचा दर वाढतो.

**7. बाजारपेढेचा आकार :–**

जर बाजारपेढेचा आकार विस्तृत असेल तर उत्पादनात वाढ होते. रोजगारी वाढते आणि दरडोई उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे आर्थिक विकासाच्या दरावर बाजाराच्या आकाराचा प्रभाव पडतो.

**8. वित्तीय स्थिरता :–**

देशाचा आर्थिक विकास त्या देशातील वित्तीय स्थैर्यावर अवलंबून असतो. बॅकींग प्रणाली सुदृढ असावी. त्यामुळे मुद्रेचा पुरवठा गरजेनूसार व्हावयास पाहिजे त्यामुळे किंमतपातळी कायम ठेवली जाईल व वित्तीय स्थिरता प्राप्त होईल.

**9. विकासात्मक नियोजन :–**

प्रत्येक बाबतीत नियोजनाला खूप महत्त्व आहे. विकासात्मक नियोजनामुळे देशातील उपलब्ध साधनांचा उपयोग केला जाऊ शकतो आणि राष्ट्रोय उत्पन्नात वेगाने वाढ होते. विकासात्मक नियोजनाच्या सफलतेवर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो.

**10. आंतरराष्ट्रोय निर्धारक :–**

अर्धविकसीत देशाच्या विकासात विदेशी भांडवल, तांत्रीक ज्ञान, आंतरराष्ट्रोय व्यापार, विदेशी गुंतवणूक यांचे बरेच महत्त्व आर्थिक विकासात दिसून येते.

आंतरराष्ट्रोय मुद्रानिधी, जागतीक बॅंक अशा महत्त्वाच्या आंतरराष्ट्रोय संख्याचा प्रभाव आर्थिक विकासावर पडतो.

**ब) आर्थिकेत्तर घटक :–**

आर्थिक विकासाचा मानवी गुणवत्ता, सामाजिक प्रवृत्ती, राजकीय परिस्थिती आणि ऐतीहासिक सयोगाशी निकटचा संबंध असतो. सामाजिक मुल्ये, सामाजिक संख्या, सांस्कृतिक प्रवृत्ती आणि प्रशासनाची पद्धती या सर्वांमूळे आर्थिक विकास प्रभावित होतो.

**1. सांस्कृतिक प्रवृत्ती :–**

आर्थिक विकासासाठी लोकांच्या सांस्कृतीक परंपरा बदलणे आवश्यक असते. परंतु लोक कोणत्याही परीवर्तनाला ताबडतोब सामोरे जात नाहीत. लोकांमध्ये असंतोष पसरतो. आणि त्याचा आर्थिक विकासावर प्रतिकुल प्रभाव पडतो. म्हणूनच सांस्कृतीक बदल करावयाचे असल्यास ते निवडक असावे. शिक्षणामुळे ज्ञानाचा मार्ग मोकळा होतो व लोक नविन बदलांना स्विकारण्यात हळूहळू तयार होतात. व त्यामुळे उत्पादनात वाढ होते.

**2. सामाजिक मुल्ये आणि सामाजिक संस्था :–**

सामाजिक मुल्ये व सामाजिक संस्था यांच्याद्वारे आर्थिक विकास प्रभावित होतो. ही मुल्ये आर्थिक विकासात अडचण आणणारे आहेत. अर्धविकसीत देशाची सामाजिक

जडणघडण ही विशिष्टय स्वरूपाची असते. त्यात संयुक्त कुटुंब पद्धती, जातीप्रथा, विशिष्ट सामाजिक प्रवृत्ती ही वैशिष्टये दिसून येतात.

**अ) <u>एकत्र कुटूंब पद्धती :–</u>**

एकत्र कुटुंब पद्धती आर्थिक विकासाला बाधक आहे. एकत्र कटुंब पद्धती, जातीप्रथा आणि लोकांच्य सामाजिक प्रवृत्ती यात अमुलाग्र बदल घडवून आणले पाहिजे.

**ब) <u>जातीप्रथा :–</u>**

अर्धविकसीत देशात जातीप्रथा अस्तित्वात आहे. जातीप्रथेचा श्रमीकांच्या गतीक्षमतेवर आणि व्यक्तीगत स्वातंत्र्यावर विपरीत परिणाम झालेला दिसतो. आर्थिक विकास हा अधिक काम करणाऱ्या आणि बचत करण्याच्या इच्छेवर अवलंबून असतो.

**क) <u>सामाजिक प्रवृत्तीमध्ये बदल :–</u>**

भारत हा विविधतेने नटलेला देश जसे भारतातः– पंजाबी, गुजराती, तामीळ, मराठी अश्या लोक आढळतात. विकास कामात एकत्र विकास पद्धती आणून जाती–जातीमध्ये न विभागता आपण सगळे एक आहो या प्रकारची कार्यपद्धती अस्तित्वात आवणायला हवी.

**ड) <u>संख्यात्मक बदल :–</u>**

आर्थिक विकासाठी शासन कुशल, सशक्त आणि निष्कलंक असण्याची गरज आहे. कारण सरकारचा व्यवहार आर्थिक क्रियांना प्रोत्साहित करू शकतो किंवा तो हतोत्साहीत देखील करू शकतो.

वरील सर्व माहिती वरून आर्थिक आणि आर्थिकेत्तर घटकांचा आर्थिक विकासावर प्रभाव पडतो हे घटक आर्थिक विकासाला प्रोत्साहन देण्याचे कार्य करते हे घटक परस्परालंबी असतात. याचा अर्थ आर्थिक घटक आर्थिकेत्तर घटकांना प्रोत्साहीत करण्याचा प्रयत्न करतात.

# मानव विकास निर्देशांक
# Human Development Index
# B.A. 6th Sem.
# Economics

आर्थिक विकासाचे अंतिम उद्दीष्टय लोकांच्या आर्थिक कल्याणात वाढ करून त्याच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा घडवून आणणे हे होते. परंतु दरडोई उत्पन्नात वाढ झाल्यावर लोकांच्या आर्थिक कल्याणात वाढ व राहणीमानात सुधारणा होईलच असे नाही. म्हणून उत्पन्न निर्देशांकातील वरील दोष टाळण्याकरिता व आर्थिक विकासाचे अचूक मोजमाप करण्याकरिता मानवी जीवनाशी संबंधीत नवीन पर्यायी निर्देशकाचा शोध सुरू झाला.

**मॉरीस डी मॉरीस** या अर्थशास्त्रज्ञाने 1979 मध्ये सरासरी आर्युमान, बालमृत्यु आणि मुलभूत साक्षरता हे तीन घटक विचारात घेण्यात आले. भौतिक जिवनमानाचा निर्देशांक विकसीत झाल्यानंतर 1990 मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाद्वारे जिवनमानाचा दुसरा निर्देशांक तयार करण्यात आला यालाच मानव निर्देशांक असे म्हणतात. हा निर्देशांक पाकिस्तानचे अर्थशास्त्रज्ञ महबुब–उल–हक यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला. यु.एन.डी.पी. 1990 पासून दरवर्षी एक मानव विकास अहवाल प्रकाशित करते.

## मानव विकासाची संकल्पना :–

यु.एन.डी.पी. द्वारे 1997 मध्ये प्रकाशित मानव विकास अहवालात मानव विकासाची संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. "मानव विकास ही अशी प्रक्रिया आहे की ज्याद्वारे सामान्य लोकांच्या निवडीचा विस्तार करून कल्याणाची उच्च पातळी गाठली जाऊ शकते".

कोणत्याही देशातील सामान्य लोकांच्या किमान पुढील तीन अपेक्षा असतात. 1) दीर्घ व स्वास्थपुर्ण जीवन घालविणे 2) ज्ञान संपादन करणे 3) चांगले राहणीमान प्राप्त करण्यासाठी आवश्यक साधने प्राप्त करणे. आर्थीक, सामाजीक व राजकीय स्वातंत्र्य, स्वाभीमान व मानवाधिकाराची हमी इत्यादीचा समावेश होतो.

❖ **मानव विकास निर्देशांकाचे सुत्रः—**

$$HDI = \frac{LET + EAI + SLI}{3}$$

HDI = मानव विकास निर्देशांक

LEI = सरकारी आयुर्मान निर्देशांक

EAI = शिक्षणाची प्राप्ती निर्देशांक

SLI= जीवनमान निर्देशांक

❖ **मानव विकास निर्देशकाचे घटक.**

मानव विकास निर्देशकामध्ये खालील तीन योग्यताचा अभ्यास केला जातो.

1. दीर्घ व स्वास्थपूर्ण जीवन जगणे
2. ज्ञान प्राप्ती करणे
3. उच्च जीवनमान जगणे.

याचे विश्लेषण पुढीलप्रमाणेः—

**1. सरासरी आयुर्मान :—**

व्यक्तीच्या जन्मापासून ते मरेपर्यंतच्या आयुष्याचा समावेश सरासरी आयुर्मानात होतो. याचा अर्थ जन्माला आलेले नवीन मुल किती वर्ष जगू शकते त्याची सरासरी होय. सरासरी आयुर्मानात जन्माच्या एका वर्षानंतरचे आयुष्य विचारात घेतले जाते.

**2. शैक्षणीक प्राप्तीः—**

या घटकाचे मोजमाप दोन भागात केले जाते.

**अ) प्रौढ साक्षरता दर :—**

15 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या व्यक्ती ज्या आपल्या दैनंदिन जीवनात लहान लहान आणि सरळ वाक्ये समजू शकतात. वाचू शकतात आणि लिहू शकतात त्यांना प्रौढ साक्षर असे म्हणतात.

**ब) संयुक्त नामांकन अनुपात :—**

कोणत्याही शैक्षणिक पातळीवर ज्याची नावे नोंदविली आहेत. अशा विद्‌यार्थ्यांची संख्या होय. यात वयाची कोणतीही अट नाही. संयुक्त नामांकन अनुपात म्हणजे शिक्षण घेणाऱ्या लोकांचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण होय.

**3. <u>जीवनमान :–</u>**

जीवनमानाचे मापन करण्यासाठी वास्तविक दरडोई सकल देशी उत्पादन विचारात घेतले जाते. कोणत्याही व्यक्तीला काही वस्तू मिळविण्याची इच्छा असते. या सर्वांची गनना करणे कठीण असते. चांगले जीवन जगण्यासाठी संसाधनांची आवश्यकता असते. दरडोई उत्पन्न हे संसाधानाचे साधे व सोपे माप असते. कारण हे आंतरराष्ट्रोय स्तरावर तुलणा करण्याच्या दृष्टीने योग्य समजले जाते. पंरतु त्यासाठी निरनिराळया देशातील दरडोई उत्पन्न एका समान मापात आणणे आवश्यक आहे.

थोडक्यात असे की राष्ट्रोय उत्पन्नतील वाढीमुळे विकास झाला असे विचारार्थ होते. परंतु मानवी कल्याणामध्ये व्यक्तीचा राहणीमानाचा दर्जा सुद्धा विचारात घ्यावा लागतो. त्यामुळे मानव विकास निर्देशांकाचा विचार झाला व त्या गुणांकावरून देशाचा विकास निश्चित करण्यात येऊ लागला.